Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 08/09/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या... आपलं महानगर | My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष

## ख्यातनाम गीतकार, गायक भूपेन हजारिका



भूपेन हजारिका आसाममधील एक ख्यातनाम गीतकार, संगीतकार, गायक व चित्रपटनिर्मिते होते. त्यांचा जन्म आसाममधील सदिया (जि. तिनसुकिआ) येथे ८ सप्टेंबर रोजी झाला. लहानपणीच आईने त्यांना संगीताची गोडी लावली. लहानपणापासून त्यांना वडिलांबरोबर बऱ्याच ठिकाणी फिरावे लागले. या काळातच १९३६ पासून त्यांच्या गीतलेखन व गायनाची सुरुवात झाली. 'बिस्व निजोय नोजोवान' हे गाणे त्यांनी इंद्रमालती या असमिया चित्रपटासाठी प्रथम गायिले (१९३९). येथूनच त्यांच्या कलाजीवनास आरंभ झाला.

हजारिका यांचे शिक्षण अनुक्रमे सोनाराम हायस्कूल (गौहाती), धुब्री गव्हर्नमेंट हायस्कूल व तेजपूर हायस्कूल येथे झाले. मॅट्रिकनंतर (१९४०) त्यांनी कॉटन कॉलेजमधून बी.ए. व बनारस हिंदू विद्यापीठातून राज्यशास्त्र विषयात एम.ए.ची पदवी संपादन केली (१९४६). त्यांनी काही काळ गोहातीच्या ऑल इंडिया रेडिओवर काम केले.

विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळाली. तिथे त्यांनी पीएच.डी.ची पदवी मिळविली (१९५२). अमेरिकेत प्रियंवदा पटेल या युवतीशी त्यांचा परिचय झाला व तिच्याशी त्यांनी विवाह केला (१९५०). अमेरिकेतून परतल्यावर १९५३ मध्ये हझारिका 'इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन' (इप्टा) या डाव्या विचारसरणीच्या नाट्यकला-क्षेत्राकडे ओढले गेले. त्यांनी अनेक असमिया चित्रपटांची निर्मिती, दिग्दर्शन व गीतरचनाही केल्या. एरा बतर सूर (१९५६), शकुंतला (१९६१), प्रतिध्वनी (१९६४), लाटी-घाटी (१९६६), चिक मिक बिजुली (१९६९), स्विकरोक्ती (१९८६), सिराज (१९८८) हे काही त्यांपैकी महत्त्वाचे चित्रपट होत. त्यांना अनेक मानसन्मान लाभले. पद्मश्री (१९७७), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९८७), दादासाहेब फाळके पुरस्कार (१९९२), पद्मभूषण (२००१), संगीत नाटक अकादमी छात्रवृत्ती (२००८), पद्मविभूषण पुरस्कार (२०१२) यांचा त्यात समावेश आहे. हजारिका यांचे

Nashik Edition

Sep 08, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401